# खाद्यपदार्थ क्षेत्रात विस्ताराची मॅरिकोची योजना

**मुंबई** : तीस वर्षे 'एफएमसीजी' क्षेत्रात नाव कमावलेल्या 'मॅरिको'ने आता खाद्यपदार्थ क्षेत्रात सर्वांत मोठी कंपनी बनण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्या स्पर्धेत विजयी होण्यासाठी ग्राहकांचे मत विचारात घेऊन, संशोधन करून नव्या पद्धतीचे आरोग्यदायी खाद्यपदार्थ आणत आहोत, असे 'मॅरिको'चे सीओओ व सीईओ संजय मिश्रा यांनी 'सकाळ'ला सांगितले.पॅराशूट, सफोला हे लोकप्रिय ब्रँड देणाऱ्या 'मॅरिको'ने गेल्या काही वर्षांमध्ये आणलेल्या चटपटीत ओट्स, सोया सफोला चंक, ओट्स नूडल्स, मध, पीनट बटर यांना खवय्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्या बळावरच येत्या दोन वर्षांत आमची उलाढाल एक हजार कोटींवर जाईल, असे कंपनीचे एम.डी. स्वागतो गुप्ता यांनी सांगितल्याचेही मिश्रा म्हणाले. रशिया युक्रेन युद्धामुळे बंद झालेला सूर्यफूल तेलाचा पुरवठा सुरू झाला असल्याने खाद्यतेलाच्या किमती कमी झाल्या असून, यापुढेही असाच कल राहील, असेही मिश्रा म्हणाले.